मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पाणी काटकसरीने वापरा, गैरवापर टाळा!

## महापालिका प्रशासनाचे नागरिकांना आवाहन



। पिंपरी-चिंचवड।
न्यूज एक्सप्रेस मराठी।

उन्हाळा सुरु झालेला आहे. येणारा पावसाळा जून मध्ये सुरु होईल यांची शाश्वती नाही. पावसाळा हा विलंबाने सुरु झाल्यास पाण्याची टंचाई शहरात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पाणी आतापासून सर्व नागरिकांनी काटकसरीने व जपून वापरणे अत्यावश्यक आहे. यासाठी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर टाळणे आवश्यक आहे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.सर्व नागरिकांनी पिण्याचे पाणी हे घरगुती वापरासाठी योग्यरित्या व काटकसरीने वापरावे. पाणी हे शिळे होत नसल्याने शिळक असलेले पाणी फेकून देऊ नये. त्या पाण्याचा पुर्नवापर करावा तसेच, पिण्याचे पाणी हे वाहने स्वच्छ करणे, बागकाम व कुंड्यासाठी, घर किंवा इमारत व परिसर स्वच्छ करणेसाठी, धुण्यासाठी वापरू नये. तसेच, सर्व सोसायटी धारकांनी एस.टी. पी. आणि बोअरवेल सुस्थितीत ठेवून त्याचे पाणी सदनिकांमध्ये स्वच्छतागृह, सोसायटी अंतर्गत उद्यान परिसराची स्वच्छता इत्यादींसाठी वापरावे, जेणेकरुन पिण्याच्या पाण्याची बचत होईल. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर गाड्या धुणे, रस्ते धुणे, घर, सोसायटी परिसर धुणे यासाठी करत असल्याचे निदर्शनास आलेस सदर ग्राहकांना गैरवापर होत असल्याबाबत प्रथमतः नोटीस बजाविण्यात येईल. तदनंतरही पुन्हा दुसऱ्यांदा असा पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करताना कोणीही आढळल्यास कोणतीही सबब, ऐकूण घेतली जाणार नाही व तात्काळ नळजोड तोडण्यात येईल. तरी सर्व पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, पाणी हे जीवन आहे. पाण्याचा वापर काटकसरीने करावा. ते जपून वापरावे म्हणजे पाण्याची बचत होईल व यामुळे यावर्षी येणाऱ्या पावसाळ्यापर्यंत म्हणजे माहे- जुन व जुलै पर्यंत पाणी सर्वांना पुरेसे उपलब्ध होऊ शकेल आणि पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही व यंदाचा उन्हाळा सर्वांना सुसह्य जाईल. पिण्याचे पाणी वाहने स्वच्छ करण्याकरिता वापरु नका. अंगण, जिने किंवा फरशी धुणे टाळा, स्वच्छतेकरिता कमीत कमी पाण्याचा वापर करा. घरातील गळणारे नळ तत्काळ दुरुस्त करुन घ्या. घरासमोरील रस्त्यावर पाणी मारु नका, रस्ते धुवू नका. कुंड्यातील झाडे, बागकामासाठी पिण्याचे पाण्याचा वापर करु नका. तरी सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, सर्वांनी आपली जबाबदारी ओळखून काटकसरीने पाणी वापरावे व पाण्याची बचत करावी, जेणेकरुन येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी पाणी टंचाई निर्माण होणार नाही, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# सलोनी मोतीबने ठरल्या ‘सौ-भाग्यवती मावळ

## ज्योती विनोदे ठरल्या लकी ड्रॉ मधील दुचाकीच्या मानकरी



। पिंपरी-चिंचवड।

कुलस्वामिनी महिला मंच मावळ यांच्या वतीने मावळ तालुक्यातील महिलांसाठी खास सौभाग्यवती मावळ २०२४ हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गेम शोमधुन प्रथम क्रमांक विजेत्या व मानाची पैठणीच्या मानकरी वडगावच्या सलोनी मोतीबने व लकी ड्रॉ मधील दुचाकीच्या मानकरी ब्राम्हणवाडीच्या ज्योती विनोदे या ठरल्या आहेत.कामशेत येथील मैदानात आयोजित कार्यक्रमाला महिलांची रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती. तब्बल चाळीस हजार महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. मावळ तालुक्याला एक सांस्कृतिक वारसा लाभला असून अशा कार्यक्रमांमुळे महिलांना मनसोक्त वावरण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होते. उपस्थित माता-भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटले, अशी प्रतिक्रिया आयोजिका सारिका शेळके यांनी दिली.मंचावर गेम शोमध्ये सहभागी झालेल्या महिलांचे विविध खेळ, गप्पा चर्चा व हास्यविनोदात कार्यक्रम संपन्न झाला. मानाची पैठणी प्रथम क्रमांकाचे टू व्हीलर बक्षीस सलोनी मोतीबने यांना मिळाले. तर अक्षदा जगताप दुसरा क्रमांक रेफ्रिजरेटर विजेत्या, तिसरा क्रमांक वॉशिंग मशीन विजेत्या भगीरथी मालपोटे, चौथा क्रमांक टिव्ही विजेत्या दर्शना भालेसेन, पाचवा क्रमांक मोबाईल विजेत्या जयश्री येवले या ठरल्या.

# स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांच्या आशिर्वादाने मावळ लोकसभेचा कायापालट करणार

## आमच्या दोघांची घटमैत्री होती: संजोग वाघेरे पाटील



**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघाचा कायालपालट केला. त्यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्याचे आशिर्वाद सदैव आमच्या पाठीशी आहेत. त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गावर पाऊल ठेवत मावळ लोकसभा मतदारसंघ विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्याचे काम करु, असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला आहे. संजोग वाघेरे पाटील यांनी पिंपळे गुरव येथील स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतीस्थळास रविवारी (दि.१७) भेट दिली. स्मृतीस्थळावर पुष्पहार अर्पण करून, नतमस्तक होत अभिवादन केले. त्यांचे आशिर्वाद घेऊन त्यांनी आपल्या प्रचारास सुरूवात केली. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक विजूअण्णा जगताप, संदेश नवले, संतोष देवकर, अनिताताई तुतारे, मोहन बारटक्के, अमित सुहासे, शांताराम वाघेरे, अमोल नाणेकर, ओंकार पवळे, अक्षय जगताप, महेश वाघेरे, रंगनाथ कापसे, सागर वाघेरे, प्रशांत वाघेरे, यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वर्गीय आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना अभिवादन केल्यानंतर संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, स्मृतीस्थळास भेट दिल्यानंतर जुन्या आठवणी जाग्या झाल्या आहेत. आमच्या दोघांची घटमैत्री होती. राम-लक्ष्मणाची जोडी म्हणून आम्हाला ओळखले जात होते. राजकीय भूमिका बदलत गेल्या. तरी देखील राजकारणापलिकडील मैत्री कायम होती. कोणत्याही राजकीय, सामाजिक, धार्मिक व इतर कार्यक्रमांना आम्ही दोघे एकत्र उपस्थित राहत होतो. माझे वडील भिकू वाघेरे पाटील यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी आयोजित ६ जून रोजीच्या कार्यक्रमास ते पिंपरीगावात आवर्जून उपस्थित राहत. लक्ष्मणभाऊंनी चिंचवड मतदार संघाचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत आणि त्यांचे आशिर्वाद सोबत घेत मी मावळ लोकसभा मतदारसंघाचा विकास करून मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार आहे, असा विश्वास संजोग वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला.

# 'स्पा' सेंटरच्या नावाखाली सुरू होता वेश्याव्यवसाय

## पोलिसांनी छापा टाकून केली चार तरुणींची सुटका



**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

निगडी येथे 'स्पा' सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या टोळीचा अनैतिक वाहतूक प्रतिबंधक विभागाने छापा टाकून पर्दाफाश केला असून चार तरुणींची सुटका करण्यात आली. छापा टाकण्यात आलेल्या 'स्पा'च्या महिला मॅनेजरला ताब्यात घेण्यात आले आहे. निगडीतील 'फोनिक्स स्पा'वर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निगडी येथे इन्स्पिरिया मॉलमध्ये फोनिक्स नावाने सुरू असलेल्या स्पामध्ये वेश्याव्यवसाय केला जात असल्याची माहिती अनैतिक वाहतूक प्रतिबंधक विभागाला मिळाली होती. तरुणींना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. पोलिसांनी 'फोनिक्स स्पा'मध्ये डमी ग्राहक पाठवला, तिथे वेश्याव्यवसाय केला जातो का ? याची शहानिशा केली. मग 'स्पा'वर छापा टाकण्यात आला. या प्रकरणी चार तरुणींची सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे. महिला मॅनेजरला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून फरार आरोपी दिनेश गुप्ताचा पोलीस शोध घेत आहेत.सदरची कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षातील पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोलिस अंमलदार मारुती करचुडे, भगवंता मुठे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, रेश्मा झावरे, सोनाली माने यांनी केली

# वाढता विरोध खा.बारणेंची डोकेदुखी

## आमदार शेळके आणि खासदार बारणे यांच्यात मतभेद वाढले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मागील दोन लोकसभा निवडणुकांमध्ये खंबीरपणे साथ देणाऱ्या घाटावरील म्हणजेच पुणे जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघातील भाजपचा आणि महायुतीतील नवीन मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचा खासदार श्रीरंग बारणे यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध असल्याचे दिसून येत आहे. कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेत महायुतीनेही सावध पावले टाकत अद्याप मतदारसंघ कोणाला सुटणार हे जाहीर केले नाही. महायुतीकडून खासदार बारणे यांना जर उमेदवारी मिळाली. तर, त्यांच्यासाठी घाटावरील वाढता विरोध डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत.मावळ लोकसभा मतदारसंघ रायगड आणि पुणे जिल्ह्यात विभागलेला



आहे. या मतदारसंघावर पुणे जिल्ह्याचेच वर्चस्व राहिले आहे. सलग तीनवेळा पिंपरी-चिंचवडकडे प्रतिनिधित्व आहे. भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीत हा मतदारसंघ शिवसेनेकडे आहे. २०१४ आणि २०१९ च्या दोन्ही लोकसभा निवडणुकीत भाजपचे तत्कालीन नगरसेवक आणि आताचे मावळचे आमदार सुनील शेळके आणि माजी आमदार बाळा भेगडे यांनी बारणे यांचे मनापासून काम केले. त्यांना मावळातून मताधिक्य मिळवून दिले होते. परंतु, आता ते दोघेही विरोधात दिसत आहेत. आमदार शेळके उघडपणे तर भेगडे यांचे कार्यकर्ते जाहीरपणे खासदार बारणे यांना विरोध करताना दिसून येत आहेत. महायुतीत सहभागी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पिंपरीतील पदाधिकाऱ्यांनीही मावळची उमेदवारी राष्ट्रवादीला मिळावी, अशी मागणी केली आहे.तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी अधिकारी आणण्यावरून आमदार शेळके आणि खासदार बारणे यांच्यात मतभेद वाढले. तेव्हापासून शेळके यांचा बारणे यांना विरोध वाढल्याचे दिसून येत आहे. तर, महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आल्याने आणि विद्यमान आमदार शेळके असल्याने विधानसभेला मतदारसंघ शेळके यांनाच सुटेल, हे गृहीत धरून भेगडे यांनी लोकसभा लढविण्याची इच्छा व्यक्त केल्याची चर्चा आहे. भेगडे यांचे कार्यकर्ते खासदार बारणे यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध करताना दिसतात. लोकसभेला संधी मिळाली नाही. तर एखादे राजकीय आश्वासन घेता येईल, या दृष्टीने भेगडे यांनीही जोर लावल्याचे दिसते. पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपच्या कार्यकर्त्यांनीही कमळावर उमेदवार असावा.

» अशी भूमिका घेतली आहे. दुसरीकडे मागीलवेळी पार्थ पवार यांचा पराभव झाल्याने त्याचे उट्टे काढण्यासाठी राष्ट्रवादीने विरोधी सूर आवळल्याची चर्चा आहे. माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी उमेदवारीसाठी आग्रह धरला आहे. एकंदरीतच खासदार बारणे यांना स्वत:चा हक्काचे मतदार असलेल्या घाटावरील पिंपरी-चिंचवड, मावळमधून विरोध वाढत आहे. घाटावरील वाढता विरोध त्यांची डोकेदुखी वाढविणारा आहे.घाटाखाली शांतता मावळ मतदारसंघात पुणे आणि रायगड जिल्ह्यातील तीन अशा सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश येतो. पुणे जिल्ह्यातील घाटावरील मावळ, पिंपरीत राष्ट्रवादीचे तर चिंचवडला भाजपच्या आमदार आहेत. तर, घाटाखालील भाजपचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर लोकसभेसाठी इच्छुक नसल्याचे सांगितले जाते. उरणचे अपक्ष आमदार महेश बालदी भाजपशी संलग्न आहेत. कर्जतमध्ये शिवसेनेचे महेंद्र थोरवे आमदार असून लोकसभेसाठी इच्छुक नाहीत. मागील दोन लोकसभा निवडणुकांमध्ये खंबीरपणे साथ देणाऱ्या पुणे जिल्ह्यातील तीन मतदारसंघातील आणि महायुतीतील नवीन मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचा बारणे यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध असल्याचे दिसून येत आहे.

# ढगाळ हवामानामुळे द्राक्षांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव

## बेदाणा उत्पादनात २० हजार टनांनी घट होण्याची शक्यता

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बेदाणा उत्पादनाचा हंगाम ऐन जोमात असतानाच दर्जेदार द्राक्षांअभावी बेदाणा उत्पादन घटले आहे. दर वर्षी एप्रिलच्या अखेरपर्यंत होणारे बेदाणा उत्पादन, यंदा जेमतेम मार्चअखेरपर्यंतच सुरू राहून, एकूण बेदाणा उत्पादनात २० हजार टनांनी घट होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बेदाण्याच्या दरातील पडझडीमुळे शेतकऱ्यांची निराशा झाली आहे. सततचा अवकाळी पाऊस आणि ढगाळ हवामानामुळे द्राक्षांवर बुरशीजन्य रोगांचा




प्रादुर्भाव वाढला होता. द्राक्ष मण्यांना तडे गेल्यामुळे आणि फळमाशीमुळे घडकूज झाली होती. द्राक्ष घडावर करपा रोगाचे काळे डाग पडले होते. अवकाळीचा फटका बसल्यामुळे द्राक्षांची टिकवणक्षमताही कमी झाली होती. परिणामी यंदाच्या हंगामात द्राक्षाचा दर्जाही काहीसा घसरला होता. त्यामुळे जानेवारीपासून म्हणजे हंगामाच्या सुरुवातीपासूनच बेदाणा निर्मितीसाठी द्राक्षाची टंचाई भासू लागली होती. दर वर्षी मार्च महिन्यात हंगाम ऐन बहरात असतो. पण, यंदा मार्च महिन्यातच बेदाणानिर्मिती थंडावली आहे. दर वर्षी एप्रिलअखेरपर्यंत हंगाम चालतो. यंदा मार्चच्या अखेरीपर्यंत चालेल, अशी शक्यता माहिती कवठेमहांकाळ येथील द्राक्षउत्पादक दिनकर गुजले यांनी दिली.मागील काही वर्षांपासून प्रामुख्याने महाराष्ट्रात आणि कर्नाटकच्या सीमा भागात सरासरी दोन लाख टन बेदाण्याची निर्मिती होती. मागील वर्षाच्या हंगामात उच्चांकी दोन लाख ७० हजार टन बेदाण्याचे उत्पादन झाले होते. जानेवारी ते एप्रिल, असा चार महिने चालणारा हंगाम यंदा फक्त तीन महिनेच चालेल आणि बेदाणा उत्पादनात सरासरी वीस टक्क्यांनी घट होऊन एकूण बेदाणा उत्पादनात सरासरी २० हजार टनांनी घट होण्याचा अंदाज, तासगाव येथील बेदाणा उत्पादक प्रशांत जाधव यांनी व्यक्त केला आहे.तासगाव परिसरात उत्पादित झालेल्या दर्जेदार बेदाण्याला हंगामाच्या सुरुवातीस सरासरी २०० ते २७० रुपयांपर्यंत दर मिळतो. यंदाच्या हंगामात सुरुवातीपासूनच दर्जानिहाय १३० ते २३० रुपये प्रति किलो दर शेतकऱ्यांना मिळत आहे. एकीकडे द्राक्ष उत्पादन आणि बेदाणानिर्मितीचा दर वाढला आहे.

# राज्यातील वीस पटसंख्येपर्यंतच्या प्राथमिक शाळांना आता किमान एक शिक्षक दिला जाणार

## आवश्यकतेनुसार दुसऱ्या शिक्षक पदावर सेवानिवृत्त शिक्षकांमधून नियुक्ती केली जाणार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील वीस पटसंख्येपर्यंतच्या प्राथमिक शाळांना आता किमान एक शिक्षक दिला जाणार आहे. आवश्यकतेनुसार दुसऱ्या शिक्षक पदावर सेवानिवृत्त शिक्षकांमधून नियुक्ती केली जाणार आहे. एक ते दहा पटसंख्येच्या शाळेसाठी आवश्यकतेप्रमाणे सेवानिवृत्त शिक्षक दिला जाणार असून, सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध नसल्यास नियमित शिक्षक देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. मात्र या निर्णयाला राज्यातील दुर्गम भागातील शिक्षक, शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे.शालेय शिक्षण विभागाने संचमान्यतेच्या सुधारित निकष निश्चित



करून त्याबाबतचा शासनादेश प्रसिद्ध केला. संचमान्यतेच्या सुधारित निकषांमध्ये अधिक स्पष्टता आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने २०२०मध्ये तत्कालीन अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्यानंतर शिक्षक संघटना आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा करून सुधारित निकषांबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार शिक्षण हक्क कायदा २००९ मधील तरतुदी विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांतील विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे शिक्षक पदे मंजूर करणे, एकाच वर्गात अधिक विद्यार्थी असल्यास शिक्षक पदे मंजूर करणे या संदर्भात निकष निश्चित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. शासनादेशानुसार १ ते २० पटाच्या शाळांसाठी किमान एक शिक्षक दिला जाईल. आवश्यकतेनुसार दुसऱ्या पदावर निवृत्त शिक्षकांची नियुक्ती करावी. एक ते दहा पटसंख्येच्या शाळेसाठी आवश्यकतेप्रमाणे निवृत्त शिक्षक देण्यात येईल. निवृत्त शिक्षक उपलब्ध नसल्यास नियमित शिक्षक देण्यात येईल. पहिली ते पाचवीसाठी २१० विद्यार्थिसंख्येपर्यंत प्रति तीस विद्यार्थ्यांमागे शिक्षकाचे एक पद देय असेल. २१० विद्यार्थिसंख्येनंतर प्रति चाळीस विद्यार्थ्यांमागे शिक्षकाचे एक पद देय असेल. पहिली ते पाचवीसाठी ३० विद्यार्थिसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे किमान १६ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल. विद्यार्थी गटाच्या संख्येपेक्षा विद्यार्थिसंख्या कमी झाल्यास संरक्षित पद कमी होईल. सहावी ते आठवीला ३५ विद्यार्थ्यांमागे शिक्षकाचे एक पद देय राहील. तसेच या विद्यार्थिसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजे किमान १८ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल. नव्याने पद मंजूर होण्यासाठी नमूद विद्यार्थिसंख्या असणे आवश्यक असेल. तसेच विद्यार्थिसंख्या कमी झाल्यास संरक्षित असलेले मंजूर पद कमी होईल. नववी आणि दहावीसाठी ४० विद्यार्थिसंख्या निश्चित करण्यात आली आहे. या गटात २२० पेक्षा अधिक विद्यार्थिसंख्या असल्यास नवीन पद देय होण्यासाठी आवश्यक ४० विद्यार्थिसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे किमान २१ विद्यार्थी असल्यास नवीन पद देयतुकडी पद्धत बंद करण्यात आल्याने पुढील काळात पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते दहावीच्या शाळांना नैसर्गिक वाढ राहणार नाही. शाळेत उपलब्ध वर्गसंख्येपेक्षा जास्त शिक्षक पदे मंजूर होत असल्यास त्यानुसार शाळेस वर्गखोल्याची संख्या आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आले आहे. होईल.

# अजित पवार यासारखा नालायक माणूस नाही

## अजित पवार यांच्यावर सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांची टीका

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पंचवीस वर्षे मंत्री केले, चार वेळा उपमुख्यमंत्री केले तरीसुद्धा काकांनी माझ्यासाठी काय केले असे म्हणायचे! पुढच्या काही वर्षांत दुसऱ्या व्यक्तीकडून आपल्याला लाभ मिळणार आहे. म्हणून वय झालेल्या व्यक्तीची आपण किंमत करत नाही. यासारखा नालायक माणूस नाही, अशा जळजळीत शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर त्यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी टीका केली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर शरद पवार आणि अजित पवार या दोन गटांमुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांबरोबरच पवार कुटुंबियांतही द्विधा मनस्थिती होती. असे असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार आणि त्यांच्या पत्नी शर्मिला पवार यांनीही ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.



बारामती तालुक्यातील काटेवाडी या पवारांच्या गावात ग्रामस्थांबरोबर एक बैठक पार पडली. या बैठकीला श्रीनिवास पवार यांनी मार्गदर्शन केले. श्रीनिवास पवार म्हणाले, की पवार साहेबांचे वय ८३ झाले आहे. या वयात त्यांना सोडणे मला पटले नाही. मला काही व्यक्ती म्हणाल्या इथून पुढची वर्षे दादांची आहेत, साहेबांची नाही. हा विचार मला वेदना देऊन गेला. भाजपने पवार साहेबांना संपवण्याचा खूप प्रयत्न केला. घरातला कुणीतरी फोडल्याशिवाय ते घर संपत नाही. हा इतिहास आहे. घर एक असेल तर ते संपवू शकत नाही. वय वाढले म्हणून तुम्ही वयस्कर माणसाला कमजोर समजू नका.श्रीनिवास काकांची भूमिका योग्य आहे, स्वतः च्या भुमिकेमुळे 'दादां'चे कुटुंब एकटे पडले, अशी टिप्पणी आमदार रोहित पवार यांनी केली. रोहित पवार म्हणाले की, श्रीनिवास काकांचा व्हीडिओ मी पाहिला आहे. लोकांना वाटते तीच भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांनी दादांना आणि साहेबांनाही जवळून बघितले आहे. श्रीनिवास पवार यांची भूमिका पवार कुटुंबीय म्हणून सामान्य माणसांना पटणारी भूमिका आहे. पवार साहेब हे पवार कुटुंबीयांची ओळख आहेत. श्रीनिवास पवार यांनी पवार कुटुंबीयांची संस्कृती बोलून दाखवली आहे. अजित पवार यांनी भूमिका घेतल्यावर कुटुंब म्हणून आम्हाला वाईट वाटलं होते.